# -: प्रेसनोट दिनांक- १७/०४/२०२५ :-

**आरोपी लोकसेवक १) संजय जयसिंग नार्वेकर, वय ५२ वर्षे, प्रभारी मुख्याध्यापक, शेलाजी वन्नाजी विदयालय, शाळा नं. २४ रविवार पेठ, कोल्हापूर, रा.सांगाव रोड, दत्त कॉलनी, कागल, ता.कागल, जिल्हा कोल्हापूर यांनी लाच मागणी केलेबाबत.....**

---

यातील तक्रारदार यांना जातीचा दाखला काढण्यासाठी त्यांचे वडीलांचा व पाच चुलते असे एकुण सहा शाळा सोडल्याचे दाखले मिळणेकरीता महानगरपालिका कोल्हापुर अंतर्गत येत असलेल्या शेलाजी वन्नाजी विदयालय शाळा क्र.२४ येथे गेले असता शेलाजी वन्नाजी विदयालयातील प्रभारी मुख्याध्यापक यांनी शाळा सोडल्याचा दाखला देण्याकरिता एका दाखल्याचे ५००/-रु प्रमाणे असे एकुण ०६ दाखले देण्याकरीता ३०००/-रु तक्रारदार यांचेकडे मागणी केली होती म्हणुन तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जामध्ये पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे वडील व इतर पाच चुलते यांचे शाळा सोडल्याचा दाखला देण्यासाठी प्रभारी मुख्याध्यापक संजय जयसिंग नार्वेकर यांनी प्रत्येकी शाळा सोडल्याच्या दाखल्याकरीता ५००/-रु प्रमाणे असे एकुण सहा दाखल्याचे ३०००/-रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता शेलाची वन्नाजी विदयालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संजय जयसिंग नार्वेकर यांनी ३०००/- रुपये लाच रक्कम स्विकाल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत **१) संजय जयसिंग नार्वेकर, वय ५२ वर्षे, प्रभारी मुख्याध्यापक, शेलाजी वन्नाजी विदयालय, शाळा नं २४, रविवार पेठ, कोल्हापूर, रा.सांगाव रोड, दत्त कॉलनी, कागल, ता.कागल, जिल्हा कोल्हापूर** यांचेविरुध्द लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरु आहे.

. सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर मार्गदर्शनानुसार बापू साळुंके, पोलीस निरीक्षक व पोहेकॉ विकास माने, सुनिल घोसाळकर, पोना सचिन पाटील पोकॉ संदिप पवार कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७, कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.